
THE



# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 15TH MARCH 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**मुंबई इलाक्यांतील पेंठ प्रांतांत अमलांत असलेला कायदा सुधारण्याकरितांच्या आक्टाच्या मसुद्यावर मुंबईचे नामदार गव्हर्नर साहेब यांच्या कौन्सिलाच्या सिलेक्ट कमिटीनें केलेला खालील रिपोर्ट व त्या सिलेक्ट कमिटीनें सुधारलेला आक्टाचा मसुदा हीं, कौन्सिलांच्या सभांचें काम चालविण्याबाबदच्या कानूंपैकीं २५ व्या कानूस अनुसरून, सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केलीं आहेत:—**

## सन १८९४ चा आक्टाचा मसुदा.

**नंबर १ नामक मुंबई इलाक्यांतील पेंठ प्रांतांत अमलांत असलेला कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा, याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.**

आह्मी, सन १८९४ चा आक्टाचा मसुदा नंबर १, नामक, मुंबई इलाक्यांतील पेंठ प्रांतांत अमलांत असलेला कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा, याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या सिलेक्ट कमिटीचे मेंबर, यांनीं सदर्हू मसुद्यांच्या ठरावांचा विचार केला आहे.

२. आह्मी अशी शिफारस करितों कीं कलम १ यांतील (१) व (२) हे आंकडे गाळावे, आणि कलम १ यांतील रिकाम्या सोडलेल्या जागा "१८९" या आंकड्यानंतर "४" हा आंकडा घालून, व "तारीख," "माहे" आणि "सन" या शब्दांपुढें अनुक्रमें "१ ली," "जानेवारी" आणि "१८९५" हे आंकडे व शब्द घालून भराव्या. आणि आह्मी अशी शिफारस करितों कीं सदर्हू मसुदा सदर्हूप्रमाणें सुधारून पास करावा.

३. सदर्हू मसुद्याचा मराठी भाषेंत केलेला तर्जुमा तारीख ८ माहे मार्च सन १८९४ च्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध करण्यांत आलाच आहे, व तो मसुदा हल्लीं सुधारला आहे त्याप्रमाणें त्याचाहि तर्जुमा प्रसिद्ध करावा असें आह्मी फर्माविलें आहे.

(सही) एच्, बर्डवुड.
„ ए. सी. ट्रेव्हर.
„ एच्: बाटी.
„ ग. दा. पान्से.
„ र. म. सयानी.

मुक्काम मुंबई, तारीख १४ माहे मार्च सन १८९४.

## मुंबई इलाख्यांतील पेंठ प्रांतांत अमलांत असलेला कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.

( तारीख १४ माहे मार्च सन १८९४ रोजीं सिलेक्ट कमेटीनें सुधारलेला. )

हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ स्टेट ह्यांनीं कौन्सिलांत तारीख १४ माहे जुलई सन १८८९ चा ठराव करून स्टाट्यूट ३३ व्हिक्टोरिया, चाप्टर ३, कलम १, ह्यांतील ठराव पेंठ प्रांतास लागू करण्याबद्दल ठरविलें आहे: या पेंठ प्रांतांत, नासिक जिल्ह्यांत अमलांत असलेला कायदा अमलांत असणें आणि तो प्रांत सन १८७४ चा शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट ह्याअन्वयें शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट असण्याचा बंद होणें हें ज्याअर्थीं इष्ट आहे, आणि ज्याअर्थीं सन १८९२ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबाबद आक्ट ह्याच्या ५ व्या कलमाअन्वयें लागणारी नामदार गव्हर्नर जनरल ह्यांची आगाऊ मंजुरी हा आक्ट करण्याकरितां मिळविण्यांत आली आहे, त्याअर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा आणि सुरुवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८९४ चा पेंठच्या कायद्यांबाबद आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो तारीख १ ली माहे जानेवारी सन १८९५ रोजीं अमलांत येईल.

सन १८७४ चा आक्ट १४ वा, ह्याची पेंठ प्रांताच्या संबंधानें सुधारणा.

२. सन १८७४ चा शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट ह्याच्या पहिल्या कलमांतल्या "शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट" संज्ञेच्या व्याख्येंत कांहीं जरी लिहिलेलें असलें तरी, त्या आक्टाच्या अर्थाअन्वयें पेंठ प्रांतास शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट समजूं नये.

नासिकचे कायदे पेंठ प्रांतास लागू करणें.

३. जे कायदे नासिक जिल्ह्यांत अमलांत असून पेंठ प्रांतांत अमलांत नसतील ते सर्व सदर्हू प्रांतांत अमलांत येतील.

इतर कायदे रद्द करणें.

४. जे कायदे सदर्हू पेंठ प्रांतांत अमलांत असून नासिक जिल्ह्यांत अमलांत नसतील, ते सर्व सदर्हू प्रांतांत रद्द होतील.

निकाल न झालेलीं कामें.

५. हा आक्ट अमलांत येण्याच्या दिवसाच्या आधीं सदर्हू प्रांतांत कोणत्याही अधिकाऱ्यासमोर सुरू झालेल्या आणि त्या दिवसापर्यंत निकाल न झालेल्या सर्व कामांचा निकाल गव्हर्नर इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या अधिकाऱ्यानें केला पाहिजे; आणि हा वरील ठराव शिवायकरून, तीं कामें हा आक्ट झाला नसता तर जशीं चाललीं असतीं तशींच चालविलीं पाहिजेत.

(सही) एच्. बर्डवुड.

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) सी. एच्. ए. हिल्,

मुंबईचे गव्हर्नर ह्यांच्या कायदे कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 15TH MARCH 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### कस्टमचे जकातीसंबंधीं कायदा सुधारण्याकरितां व इतर कारणांकरितां आक्टाचा मसुदा.

उद्देश.

समुद्रावरून येणाऱ्या जाणाऱ्या मालावरील कस्टमच्या जकातीसंबंधीं कायदा सुधारणें, व हिंदुस्थानांतील कित्येक **परकी युरोपीयन संस्थानांच्या** व कित्येक **देशी संस्थानिकांच्या** सरहद्दींतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर जकात घेण्याविषयीं तजवीज करणें योग्य आहे यामुळें खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

लहान सरनामा.

१. या **आक्टास** "**सन १८९४ चा हिंदुस्थानाचा तारिफासंबंधीं आक्ट**" असें ह्मणावें.

स्थानिक व्याप्ति व सुरुवात.

**एडन** व **पेरिम** शिवायकरून तो सर्व **ब्रिटिश इंडियास** लागू आहे; आणि तो ठरला ह्मणजे अमलांत येईल.

आक्ट रद्द केले ते.

२. पहिल्या परिशिष्टांत सांगितलेले **आक्ट** त्या परिशिष्टांत सांगितलें आहे तेथवर रद्द केले आहेत असें समजावें.

कायम ठेवण्याविषयीं कलम.

परंतु यापैकीं कोणत्याही **आक्टा**अन्वयें प्रसिद्ध केलेले जे जाहिरनामे व केलेले जे कानू व हुकूम हल्लीं अमलांत असतील ते, या **आक्टास** अनुसरून असतील तेवढ्या पुरते, या **आक्टा**अन्वयें प्रसिद्ध केलेले आहेत असें समजलें पाहिजे :

हा **आक्ट** अमलांत येण्यापूर्वीं ठरविण्यांत आलेल्या **आक्टांमध्यें** अगर **कायद्यां**मध्यें सन १८७९ चा हिंदुस्थानचा तारिफाचा **आक्ट** आणि सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफाचा **आक्ट** ह्यांसंबंधी केलेले सर्व उल्लेख ह्या **आक्टास** अनुलक्षून केलेले आहेत असें समजावें.

आणि मीठ, अफीण, व गाळलेली दारू हीं खेरीजकरून इतर कोणताही पदार्थ **ब्रिटिश इंडियां**तील एका बंदराहून दुसऱ्या बंदरास नेला असतां त्यावर कस्टमची जकात घेण्याचा अधिकार या **आक्टां**तील कोणत्याच ठरावावरून प्राप्त होतो असें समजूं नये.

परिशिष्टांत सांगितलेल्या जकाती वसूल करावयाच्या.

३. ज्या ज्या बंदरास हा **आक्ट** लागू आहे त्या त्या बंदरांत या **आक्टास** जोडलेल्या तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या परिशिष्टांत सांगितलेल्या जकाती बसवून वसूल केल्या पाहिजेत.

कोचिनांतून मिरीं बाहेर पाठविणें.

४. **कोचिन**च्या बंदरांतून समुद्रावरून पाठविलेल्या सर्व मिऱ्यांवर दर खंडीस पराकाष्ठा नऊ रुपयेपर्यंत जितकी जकात **मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल** हे वेळोवेळीं ठरवितील तितकी जकात घेतली पाहिजे; आणि दरसाल अखेरीस, अगर त्या नंतर सोईस पडेल तितक्या लवकर, सदरहू बंदरांतील **कस्टम**च्या कलेक्टरानें, या कलमाअन्वयें वसूल केलेल्या जकातींतून ती वसूल करण्याचा खर्च बाद करून, बाकीचा ऐवज **मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल** वेळोवेळीं फर्मावितील त्या प्रमाणानें व त्या रीतीनें **त्रावणकोर**च्या व **कोचिन**च्या **सरकारांस** दिला पाहिजे.

सरहद्दीवरून येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात.

५. खालीं लिहिलेल्या ठिकाणांहून अगर ठिकाणीं खुष्कीच्या मार्गानें जाणाऱ्या येणाऱ्या मालावर या **आक्टास** जोडलेल्या दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या परिशिष्टांत अनुक्रमें ठरविलेल्या दरांप्रमाणें कस्टमच्या जकाती घेतल्या पाहिजेत; तीं ठिकाणें:—

मद्रास इलाक्यांतील व मुंबई इलाक्यांतील परकी यूरोपीयन संस्थानांच्या सरहद्दीवरून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर.

(अ) **मद्रास**चे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या अगर मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या वहिवाटींतील कोणत्याही भागाच्या सरहद्दीवर असलेलीं **परकी यूरोपीयन** संस्थानें;

परकी मुलुकाच्या हद्दीवरून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर.

(ब) यांत पुढें दिलेल्या अधिकारावरून परकी मुलुक ह्मणून ठरवलेला कोणताही मुलुक.

कोणताही मुलुक परकी ठरविण्याचा अधिकार.

**गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** यांच्या निर्बंधास पात्र राहून, **मद्रास**चे **गव्हर्नर इन् कौन्सिल** व **मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल** यांना वेळोवेळीं, स्थानिक सरकारी **ग्याझेटांत** जाहिरनामा प्रसिद्ध करून, त्या त्या **गव्हर्नरांच्या** वहिवाटीखालील मुलुकांमध्यें अगर त्या मुलुकांच्या सरहद्दींवर असलेल्या परंतु त्या मुलुकांतील **कोर्टांच्या** व **दिवाणी** अधिकारांच्या हुकुमतीखालीं नसणाऱ्या कोणत्याहि **देशी संस्थानिकांचा** मुलुक या कलमाच्या कारणांकरितां परकी मुलुक समजला पाहिजे असा ठराव करण्याचा अखत्यार आहे.

**गव्हर्नर जनरल** इन् कौन्सिल यांना, वेळोवेळीं, **इंडिया ग्याझेटांत** जाहिरनामा प्रसिद्ध करून, असें ठरविण्याचा अखत्यार आहे कीं, इतर कोणत्याही **स्थानिक सरकाराच्या** वहिवाटीखालील कोणत्याही **देशी संस्थानिकाचा** मुलुक या कलमाच्या कारणांकरतां परकी मुलुक समजावा.

सन १८६३ चा आक्ट १६ वा, कलम १, ह्याची सुधारणा.

६. सन १८६३ चा आक्ट १६ वा, कलम १, ह्यांत, "१० टकेप्रमाणें जकात होईल ती" ह्या शब्दांच्या ऐवजीं, "९ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशा दरानें जकात" हे शब्द दाखल करावे..

सर्टिफिकेटाचा आधार असलेल्या गाळलेल्या दारूवर, अफिणीवर व मिठावर जकात.

७. ब्रिटिश इंडियांतील कोणत्याही बंदरांतून आणलेली, गाळलेली दारू, अफीण व मीठ हीं, **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** यांनीं अगर **स्थानिक सरकारानें** त्या संबंधानें अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदाराच्या सर्टिफिकेटाच्या आधारावर आणलीं असल्यास, या **आक्टास** जोडलेल्या दुसऱ्या परिशिष्टाआधारें त्यांवर घ्यावयाची जकात सदरहू सर्टिफिकेटांत त्यांवर आगोदरच दिली ह्मणून लिहिलेल्या जकातीपेक्षां कांहीं जास्त ठरत असल्यास तेवढी जास्त रकम मात्र त्यांबदल घेतली पाहिजे.

अशी अफिणीची अगर मिठाची किंमत ह्मणून **सरकारास** एकादी रकम भरलेली असल्यास ती या कलमाच्या उद्देशाप्रमाणें जकात होत नाहीं.

सन १८७८ चा जलमार्गाच्या कस्टमबाबत आक्ट ह्याच्या १४ व्या बाबींतल्या ठरावांअन्वयें जी गाळलेली दारू एक्साइजच्या ड्यूटीबाबत खत लिहून देऊन एका कस्टमच्या बंदरापासून दुसऱ्या कस्टमच्या बंदरास पाठविण्यांत येईल तिला ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

८. **मद्रास इलाख्याच्या** संबंधानें १८४४ चा **आक्ट** नंबर ६ याचे, व **मुंबई इलाख्याच्या** संबंधानें १८५७ चा **आक्ट** नंबर २९ याचे जकाती घेण्याबाबदचे व जकात घेण्यालायक मालाबाबदचे रद्द न झालेले ठराव, जरूरीच्या फेरफारानें, पांचव्या कलमाच्या (ब) रकमेअन्वयें, अगर तिच्या आधाराबर घ्यावयाच्या जकातींना व जकात घेण्यालायक मालाला लागू होतील.

*जकातींबाबद व मालाबाबद कित्येक ठराव लागू करणें.*

९. या **आक्टा**अन्वयें प्रसिद्ध केलेले दरोबस्त जाहिरनामे, ज्या अधिकाऱ्याकडून ते प्रसिद्ध केले जातील त्याला रद्द करण्याचा अखत्यार आहे.

*जाहिरनामे रद्द करण्याचा अधिकार.*

१०. कोणतीही वस्तु विकण्याचा करार करितांना त्या वस्तूवर कोणतीही जकात पडत नसल्यामुळें जकात देण्याची कोणतीही शर्त घातल्याशिवाय ती वस्तु विकण्याचा करार केल्यानंतर अथवा तसा करार करतांना त्या वस्तूवर जकात पडत असल्यामुळें त्या जकातीसुद्धां ती वस्तु विकण्याचा करार केल्यानंतर त्या वस्तूवर कस्टमची अगर एकसाइजची कोणतीही जकात बसविण्यांत येईल, जास्त करण्यांत येईल किंवा कमी करण्यांत येईल किंवा माफ करण्यांत येईल त्याप्रसंगीं—-

*करार केल्यानंतर जकात जास्त करण्यांत आल्यास जास्त केलेली जकात मिळवावी. आणि ती कमी करण्यांत आल्यास कमी केलेली जकात वाद करावी.*

(अ) अशा बसविलेल्या अगर जास्त करण्यांत आलेल्या जकातीचा जर अशा रीतीनें अमल होईल कीं, ती बसविलेली जकात अगर जास्त केलेली जकात--जी असेल ती--भरण्यांत येते, तर, विकणाऱ्यास, त्या जकातीइतकी अगर जास्त केलेल्या जकातीइतकी रकम करारांत लिहिलेल्या किंमतींत मिळविण्याचा अखत्यार आहे; आणि अशी जास्त झालेली रकम मिळविण्याचा आणि तिच्याबद्दल दावा करून ती वसूल करण्याचा त्या विकणाऱ्यास हक्क आहे असें समजावें, आणि

(ब) अशा कमी केलेल्या जकातीचा अगर माफीचा जर अशा रीतीनें अमल होईल कीं, कमी केलेली जकात मात्र देण्यांत येते किंवा जकात मुळींच देण्यांत येत नाहीं,--जसें असेल तसें--तर खरेदी करणारास, कमी केलेल्या अगर माफ केलेल्या जकातीइतकी रकम करारांतील रकमेंतून बाद करण्याचा अखत्यार आहे; आणि ह्याप्रमाणें बाद केलेली रकम देण्यास अगर तिच्या संबंधानें अगर बद्दल दावा केला जाण्यास तो पात्र होणार नाहीं.

११. जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट नामक सन १८७८ चा आक्ट ८ वा ह्याच्या २३ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत, "हकीकतीवरून" ह्या शब्दानंतर, "गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी घेऊन" हे शब्द दाखल करावे.

*सन १८७८ चा आक्ट ८ वा, कलम २३, पारिग्राफ २, ह्याची सुधारणा.*

---

## परिशिष्ट १ लें.

### रद्द केलेले आक्ट.

| नंबर व वर्ष. | लहान सरनामा. | कोठवर रद्द केला. |
|---|---|---|
| १८८२ चा ११ ... | १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट. ... | सगळा. |
| १८९२ चा ९ ... ... | सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबद आक्ट. | " |
| १८९३ चा ९ ... ... | " " " ... | " |

## परिशिष्ट २ रें.—( देशांत येणाऱ्या मालाचें तारीफ. )

हत्यारें, युद्धसामग्री व लष्करी सरंजाम—ह्यांत, ह्या परिशिष्टांत विशिष्ट रीतीनें सांगितलेल्या पदार्थांशिवाय, खालीं लिहिलेल्या पदार्थांचा समावेश होतो. ते पदार्थ येणेंप्रमाणें :—

(अ) सन १८७८ चा हिंदुस्थानचा हत्यारांबाबद आक्ट (सन १८७८ चा ११ वा) ह्याच्या अर्थाअन्वयें "हत्यारें" किंवा "युद्धसामग्री" असणारे सर्व पदार्थ आणि

(ब) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, ह्या आक्टाच्या कारणासाठीं, इंडिया गॅझेटमध्यें जाहिरनामा देऊन वेळोवेळीं ज्या कोणत्याही पदार्थांस "युद्धसामग्री" ह्मणून ठरवितील ते सर्व पदार्थ.

| पदार्थांचीं नांवें. | जकात. रु. | आ. |
|---|---|---|
| अग्निशस्त्रें व त्यांचे भाग— | | |
| १. तमंचा खेरीज इतर अग्निशस्त्रें, प्रत्येकाबद्दल. ... ... ... | ५० | ० |
| २. त्यांकरतां नळ्या, ती मग एक नळी असो अगर जोडनळी असो, प्रत्येकीबद्दल. | ३० | ० |
| ३. तमंचे, प्रत्येकाबद्दल ... .... ... ... ... | १५ | ० |
| ४. त्यांकरतां नळ्या, ती मग एक नळी असो अगर जोडनळी असो, प्रत्येकीबद्दल. ... ... ... ... ... ... | १० | ० |
| ५. अग्निशस्त्रांकरतां उपयोग करावयाच्या कमानी, प्रत्येकीबद्दल ... ... | ८ | ० |
| ६. बंदुकीचे दस्ते, सैट्स (माशा)ब्लॉक व रोलर, प्रत्येकाबद्दल ... ... | ५ | ० |
| ७. रिवाल्वर ग्रीची, जितकीं काडतुसें त्यांत राहतील त्या दरएक काडतुसाबद्दल. | २ | ८ |
| ८. एक्ट्राक्टर, निप्पर, हीलप्लेट, पिन्, स्क्रयू, व्यांग, बोल्ट, थम्बपीस, ट्रिगर, ट्रिगरगार्ड, ह्यामर, पिस्टन, प्लेट, व अग्निशस्त्रांच्या ज्या इतर भागांकरतां यांत एरवीं ठराव केला नसेल ते भाग, आणि तीं साफ करण्यासाठीं किंवा जोडण्यासाठीं किंवा भरण्यासाठीं उपयोग करावयाचीं सर्व हत्यारें, प्रत्येकाबद्दल. ... ... ... ... | १ | ८ |
| ९. काडतुसें करण्याचीं, भरण्याचीं किंवा बंद करण्याचीं यंत्रें, प्रत्येकाबद्दल ... | १० | ० |
| १०. काडतुसांला तोंड्या बसवायाचीं यंत्रें, प्रत्येकाबद्दल ... ... ... | २ | ८ |

**अपवाद १ ला.**—वरील तपशिलाच्या ५ व्या, ६ व्या, ८ व्या, ९ व्या, अगर १० व्या सदरांत येणारे पदार्थ, १ ले किंवा ३ रे सदरांत मोडणारे अग्निशस्त्रासंबंधाचे असून अशा अग्निशस्त्राबरोबर एकाच पेटींत बसविले असतील तेव्हां, त्यांवर जकात पडणार नाहीं.

**अपवाद २ रा.**—राजदूतकर्तव्यविषयक, लश्करी अगर पोलीस युनिफॉर्म वापरण्याचा हक्क असणाऱ्या अमलदाराच्या नेहमीच्या सरंजामाचीं अङ्गभूत हत्यारें व लष्करी अमलदाराबरोबर असणारा रिव्हाल्वर अगर तमंचाची जोडी यांवर जकात पडणार नाहीं.

**विशेष ठराव १ ला.**—वरील तपशिलांत सांगितल्यापैकीं कोणतेही पदार्थ जवळ असण्याचा कायदेशीर रीतीनें हक्क असणाऱ्या कोणी मनुष्यानें ते आपल्या खासगी उपयोगाकरतां वाजवी प्रमाणानें बाहेरून आणले असतां त्यांवर किंमतीच्या आकारावरून दहा टक्यांहून जास्त जकात घेतां नये.

## परिशिष्ट २ रें.—( पुढें चालू ).

**विशेष ठराव २ रा.**—इतर रीतीनें जे पदार्थ बाहेरून आणले असतील व ज्यांवर या सदराआधारें जकात घेतली असेल अगर ध्यावयाची असेल असे पदार्थ बाहेरून आणणाराकडून वर सांगितल्याप्रमाणें कायदेशीर रीतीनें हक्क असणाऱ्या मनुष्यानें आपल्या खासगी उपयोगाकरतां वाजवी प्रमाणानें फुटकळ विकत घेतले, तर, आणणाराला, किंमतीच्या आकारावरून शेंकडा दहा टक्यांहून जास्त असेल तेवढी त्यांवरील जकात परत मिळण्याविषयीं अगर सोडण्याविषयीं ( असेल त्याप्रमाणें ) **कस्टम**-कलेक्टराकडे अर्ज करण्याचा अखत्यार आहे ; आणि सदहू पदार्थ तेच आहेत, व अशा आणणाऱ्याला जकात सदहूप्रमाणें परत अगर माफ होण्याचा एऱ्हवीं हक्क आहे अशी सदहू कलेक्टराची खात्री होईल, तर त्यानें ती परत दिली अगर माफ केली पाहिजे.

| | | तारिफाप्रमाणें किंमत. | | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| ११. | बंदुकीची दारू, साधी .... ... ... | दर रतलास. | ० | ६ | शेंकडा १० टक्के. |
| | ,, शिकारीची ... ... ... | दर रतलास. | १ | ० | |
| १२. | इतर सर्व प्रकारचीं हत्यारें, युद्ध सामुग्री आणि लष्करी सरंजाम | किंमतीवर. | | | |

---

## परिशिष्ट ३ रें.—(देशांत येणाऱ्या मालाचें तारिफ ).

### दारू, अफीण, मीठ, आणि खारवलेली मासळी.

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येकीं. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|
| १ | **दारू—** | | |
| | एल, बीर, व पोर्टर, ... .... ... ... | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट वाटल्यांस. | एक आणा. ... ... |
| | सैडर व धान्य वगैरे कुजवून त्यापासून तयार केलेल्या इतर दारू. ... .... ... ... | | |
| | लिकर ... ... ... ... ... | सदर. ... ... | ६ रुपये ... ... ... |
| | कलाकौशल्यें किंवा कारखाने किंवा रासायनिक क्रिया यांतच मात्र उपयोग करावयाची गाळलेली दारू मनुष्यानें पिण्याला अगदीं व कायमची नालायक केली असेल ती ... ... ... ... | ...... | किंमतीप्रमाणें शेंकडा ५ टक्के. ... .... ... |
| | औषधी द्रव्यांत, औषधांत अगर रसायनांत लंडन कसाचे प्रुफचे गाळलेले दारूच्या शेंकडा २० या प्रमाणाहून कमी प्रमाणानें उपयोग केलेली गाळलेली दारू. ... .. ... ... ... | | |

## परिशिष्ट ३ रें.— (पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येकीं. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|
| | शेंकडा वीस अगर ह्याहून जास्त या प्रमाणानें सदहूंप्रमाणें उपयोग केलेली गाळलेली दारू. | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट वाटल्यांस. | ६ रुपये, आणि सदहूं दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका अधिक असेल किंवा कमी असेल त्याप्रमाणें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | गाळलेली दारू, सुवासिक, पिंपांमध्यें, अगर वाटल्यांमध्यें. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट वाटल्यांस. | ८ रुपये. |
| | गाळलेली दारू, इतर प्रकारची ... ... | लंडन प्रुफचे कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट वाटल्यांस. | ६ रुपये आणि सदहूं दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका जास्त असेल किंवा कमी असेल तितक्या प्रमाणानें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | वैन— | | |
| | प्रूफ गाळलेली दारू ४९ टक्यांपेक्षां जास्त प्रमाण नसणारी शांपेन व इतर सर्व चकाकणारी वैन. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा क्वार्ट वाटल्यांस. | २ रुपये ८ आणे. |
| | प्रूफ गाळलेली दारू ४९ टक्यांपेक्षां जास्त प्रमाण असणारी शांपेन व इतर सर्व चकाकणारी वैन. | ,, | ६ रुपये. |
| | प्रूफ गाळलेली दारू ४९ टक्यांपेक्षां जास्त प्रमाण नसणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या वैन. | ,, | १ रुपया. |
| | प्रूफ गाळलेली दारू ४९ टक्यांपेक्षां जास्त प्रमाण असणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या वैन. | ,, | ६ रुपये. |
| २ | **सरकारी पास नसलेली अफीण** ... ... | ८० तोळ्यांच्या शेरास. | २४ रुपये. |
| ३ | मीठ ... ... ... ... ... | ८२$\frac{2}{7}$ अव्हायर्डुपाइज पौंड वजनाच्या हिंदुस्तानी मणास. ... | ज्याठिकाणीं मीठ आणावयाचें असेल त्या ठिकाणीं तयार केलेल्या मिठावर त्या त्या वेळीं घ्यावयाच्या एक्साइजच्या जकातीचा दर. |
| ४ | खारवलेली मासळी, ओली अगर सुकी. ... ... | ,, | गव्हनर जनरल इन् कौन्सिल हे इंडियागॅझेटांत जाहीरनामा देऊन वारा आण्यांपेक्षां जास्त नाहीं असा किंवा असे जे दर ठरवितील तो किंवा ते दर. |

## परिशिष्ट ४ थें—(देशांत येणारी मालाचें तारिफ).

### सामान्य जकात.

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | **खाण्याचे व पिण्याचे पदार्थ.** | | रु. | आ. | |
| १ | काफी ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६५ | ० | दर शेंकडा ५ |
| २ | फळें व वनस्पतीसंबंधी पदार्थ. | | | | टक्के. |
| | वदामाचे गोळे ... ... ... ... | ,, | ४० | ० | ,, |
| | वदाम सालासहीत ... ... ... | ,, | १३ | ० | ,, |
| | काजूगोळे ... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | नारळ ... ... ... ... ... | हजारास. | ४० | १० | ,, |
| | खोबरें ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ | ० | ,, |
| | मनुका, विलायती ... ... ... | ,, | ३५ | ० | ,, |
| | ,, इराणी ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | खारका कप्यांतील ... ... ... | ,, | ५ | ० | ,, |
| | खजूर, कप्यांतील ... ... ... ... | ,, | १४ | ० | ,, |
| | ,, वरण्यांतील व पेट्यांतील ... ... | ,, | ८ | ० | ,, |
| | अंजीर विलायती ... ... ... | ,, | ४२ | ० | ,, |
| | ,, इराणी सुके ... ... ... | ,, | ६ | ८ | ,, |
| | लसूण ... ... ... ... .. | ,, | ५ | ० | ,, |
| | पिस्ते ... ... ... ... ... | ,, | २५ | ० | ,, |
| | पून्स बसराई (अलूबुखार) ... ... ... | ,, | १० | ० | ,, |
| | द्राक्षें काळीं, पर्शियन गल्फचीं व रेडसीचीं व खिसमीस ... .. ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | ,, मनुका पर्शियन गल्फच्या व रेडसीच्या ... | ,, | १० | ० | ,, |
| | ,, मलागा व ब्लूम ... ... ... | रतलास. | ० | १० | ,, |
| | ,, इतर प्रकारच्या ... ... ... | | किमतीवर. | | ,, |
| | अकरोड ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे, ताजीं फळें व भाजीपाला जो वेगळा लिहिला नाहीं व ज्याची जकात माफ आहे तो खेरीज करून ... ... ... | | किमतीवर. | | ,, |
| ३ | **अन्नसामग्री, आईलम्यान्स स्टोर (तेल, मध, विनागरी व दारू यांही करून तयार केलेले खाण्याचे पदार्थ विलायतेहून येतात ते), आणि किराणा जिन्नस.** | | | | |
| | डुकराचें मांस डब्यांतील, जौल व गालफडें ... | रतलास. | ० | १२ | ,, |
| | गुराचें व डुकराचें मास— | तीन हंड्रेडवेटाचे टियर्सास | ७६ | ० | ,, |
| | | दोन हंड्रेडवेटाचे पिंपास. | ५० | ० | ,, |
| | समुद्रांतील जळवा ... ... ... | हंड्रेडवेटास. | ५० | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | लोणी ... ... ... ... ... | रतलास | १ | ... | दर शेंकडा ५ टक्के. |
| | पनीर ... ... ... ... ... | ,, | ० | १२ | ,, |
| | चिनाई मुरंबे ... ... .. ... | सहा वर्ष्यांचे पेटीस. | ८ | ० | ,, |
| | मासळीचे मोत ... .. ... ... | हंड्रेडवेटास. | १०० | ० | ,, |
| | पीठ ... ... ... ... ... | २०० रतलांचे पिंपास किंवा थैल्यास. | २० | ० | ,, |
| | तूप ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४० | ० | ,, |
| | किराणा ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला नाहीं तो ... ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | डुकराच्या तंगड्या ... ... ... | रतलास. | ० | १२ | ,, |
| | सागूदाणा ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | ,, |
| | शार्क माशाचे पंख ... ... ... | ,, ... | ३० | ० | ,, |
| | सिंगाली व सोझेली ... ... .... | ,, | १५ | ० | ,, |
| | तापीओका .... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | विनिगरी विलायती, पिंपांतील . . ... | इंपीरियल ग्यालनास. | १ | ० | ,, |
| | ,, इराणी ... ... ... | ,, | १ | | ,, |
| | ,, गांवठी ... ... ... | ,, ... | ० | ६ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे खाण्याचे पदार्थ आइमोसस्टोर्स व किराणा जिन्नस ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ४ | मसाल्याचे पदार्थ— | | | | |
| | बादियान. ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २५ | ० | ,, |
| | सुपाऱ्या गोवेगिरी... ... ... ... | ,, ... | १४ | ० | ,, |
| | पोफळें... ... ... ... ... | हजारास. | २ | ० | ,, |
| | सुपारी पांढरी श्रीवर्धनी ... ... ... | हंड्रेडवेटास. | २८ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या सुपाऱ्या... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | वेलची, खोटी नाहीं अशी ... ... ... | ,, | २५० | ० | ,, |
| | मिरच्या सुक्या ... ... ... ... | ,, | ९ | ० | ,, |
| | लवंगा ... ... ... ... ... | ,, | २० | ० | ,, |
| | ,, देंट आणि फुलें ... ... ... | ,, | ५ | ० | ,, |
| | ,, मोहर, नरलवंग ... ... .. | ,, | ८ | ० | ,, |
| | सुंट सुकी | ,, | २० | ० | ,, |
| | जायपत्री ... ... ... ... | रतलास. | १ | ८ | ,, |
| | जायफळें ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| | जायफळें सालासुद्धां ... ... ... | रतलास. | ० १० | दर शेंकडा ५टक्के. |
| | मिरीं, काळें व पिंपळ्या ... ... ... | हंड्रेडवेटास. | १६ ० | ,, |
| | ,, पांढरे ... ... ... ... | ,, | ३५ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे मसाल्याचे पदार्थ ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ५ | खडीसाखर चिनाई ... ... .... | हंड्रेडवेटास. | २० ० | ,, |
| | शुगर लोफ ... ... ... ... | ,, | २३ ० | ,, |
| | पिठी ... ... ... ... ... | ,, | १२ ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारची साखर, शर्करांशी इतर सर्व पदार्थ, आणि मिठाई धरून ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ६ | चाहा काळा ... ... ... ... | रतलास. | ० १० | ,, |
| | ,, हिरवा ... ... ... ... | ,, | १ ४ | ,, |
| | **रसायनें, औषधी, औषधें व कैफ आणणारे पदार्थ आणि रंग करण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ.** | | | |
| ७ | रसायनक्रियेऱ्या संबंधानें झालेले व तयार केलेले पदार्थ— | | | |
| | आसिड् सल्फ्यूरिक ( गंधकाचें तेजाव ) ... | रतलास. | ० २ | ,, |
| | अलकली (खार), गांवठी, (सज्जीखार)... ... | हंड्रेडवेटास. | २ ० | ,, |
| | फटकी... ... ... ... ... | ,, | ५ ० | ,, |
| | सोमल... ... .. ... ... | ,, | २५ ० | ,, |
| | ,, चिनाई मनशील ... ... | ,, | १६ ० | ,, |
| | बायकार्बोनेट आफ सोडा ... ... ... | ,, | ७ ० | ,, |
| | हिराकस ... ... ... ... | ,, | ३ ० | ,, |
| | बारी पदार्थ, उदाहरणार्थ, सुरुंगाचें जिलटैन, डैनमैट रॉब्युराइट, टोनाइट, व इतर प्रकारचे ... | ... | किंमतीवर. | ,, |
| | नवसागर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३० ० | ,, |
| | गंधक, भुकी .... ... ... .. | ,, | ५ ८ | ,, |
| | ,, कांड्याचा ... ... ... | ,, | ५ ० | ,, |
| | ,, कच्चा .. ... ... | ,, | ४ ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे रसायनक्रियेच्या संबंधानें झालेले व तयार केलेले पदार्थ ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ८ | **औषधी, औषधें, आणि कैफ आणणारे पदार्थ.** | | | |
| | येळिया, काळा ... .... ... ... | हंड्रेडवेटास. | १४ ० | ,, |
| | ,, सिकोत्र्याचा ... ... ... | ,, | २५ ० | ,, |
| | अगरू ... ... ... ... ... | रतलास. | ३ ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | हिंग ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ८० | ० | दर शेंकडा ५टक्के. |
| | हिंग, जाडा ( हिंगडा ) ... ... | ,, | १८ | ० | ,, |
| | अतारी, पर्शियन ... ... ... ... | ,, | १५ | ० | ,, |
| | अमलसारी गंधक... ... ... ... | ,, | ४५ | ० | ,, |
| | कापूर, भीमसेनी (बरास) ... ... | रतलास. | १०० | ० | ,, |
| | ,, साफ केलेला, वड्यांचा ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | ,, कच्ची, भुकी ... ... ... | ,, | ० | १२ | ,, |
| | काशिया लिग्निया ( दालचिनी ) ... ... | हंड्रेडवेटास. | २० | ० | ,, |
| | चोंबचिनी सालीसकट ... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | ,, साल काढलेली ... ... ... | ,, | १६ | ० | ,, |
| | गलंगल, चिनी ... ... ... ... | ,, | ८ | ० | ,, |
| | अक्कलकाडा .... .... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | सालममिश्री ... ... ... ... | ,, | १०० | ० | ,, |
| | सोनामुखीचीं पानें... ... ... ... | ,, | ४ | ८ | ,, |
| | शिळारस ... .. ... ... | ,, | ४६ | ० | ,, |
| | तंबाखू तयार केलेली व तयार न केलेली... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या औषधी, औषधें व कैफ आणणारे पदार्थ, क्विनीनवर जकात माफ आहे तें व अफीण (हिच्याबद्दल परिशिष्ट ३ पाहा ) खेरीजकरून ... | ... | ,, | | ,, |
| ९ | रंग करण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ— | | | | |
| | अलिझरीन रंग—सर्व रंगांचे ... ... ... | .. | ,, | | ,, |
| | अनिलैन ... .... .... ... ... | रतलास. | १ | ८ | ,, |
| | किर्मीज ... ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | हरडे, ... ... .... ... ... | हंड्रेडवेटास. | ४ | ८ | ,, |
| | माजूफळ, इराणी ... ... ... ... | ,, | ३७ | ० | ,, |
| | मंजिठ ... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | आर्चिलावीड ( एकाजातीचें गवत रंगाकरितां मोसंबीकडून येत असतें तें ) ... ... ... | ,, | ९ | ८ | ,, |
| | पतंगाचें लांकूड व मूळ ... ... ... | ,, | ५ | ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे रंग करण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | **धातु व धातूच्या केलेल्या जिनसा.** | | | | |
| १० | शेतकीच्या कामाचीं हत्यारें, यंत्रांस जकात माफ आहे तीं शिवाय करून ... ... ... | ... | ,, | | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| ११ | लोखंडी सामान व कटलरी ( चाकू कातऱ्या वगैरे ) लोखंडाचें तयार केलेलें सामान व रुपेरी मुलामा दिलेलें सामान या सुद्धां परंतु यंत्रें व यंत्राचे भाग ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून ... | ... | किमतीवर. | | दर शेंकडा ५ टक्के. |
| १२ | धातू, घांट न घडलेल्या व घांट घडलेल्या व धातूच्या केलेल्या जिनसा— | | | | |
| | पितळेचे मणी, घागऱ्या चिनाई ... ... | हजारास. | १ | ० | ,, |
| | जुनी पितळ ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २७ | ० | ,, |
| | पितळेचे पत्रे, वळविलेले फार पातळ ... ... | ,, | ७५ | ० | ,, |
| | पितळेची तार .. ... ... ... | रतलास. | ० | ७ | ,, |
| | पितळेच्या इतर सर्व प्रकारच्या जिनसा ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | तांबें— | | | | |
| | आस्ट्रेलियाचें ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४० | ० | ,, |
| | सळ्या ... ... ... ... ... | ,, | ४३ | ० | ,, |
| | ब्रेझियरचें (एका जातीचे खिळे) व पत्रे ... ... | ,, | ४३ | ० | ,, |
| | चिनाई नाणें ... ... ... ... | ,, | ३२ | ० | ,, |
| | जपानचें ... ... ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | खिळे व मिश्र धातूचे खिळे ... ... .... | ,, | ४३ | ० | ,, |
| | जुनें ... ... ... ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | पाटे ज्यास हत्तिपगे ह्मणतात ते ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | पत्रे व तळ ... ... ... .. | ,, | ४५ | ० | ,, |
| | विटा, पाट वगैरे तुकड्याचे जातीचे येतात ते ... | ,, | ३९ | ० | ,, |
| | चिनाई कोपरबराकी ... ... ... | रतलास | १ | ० | ,, |
| | वर्ख किंवा दाकपान ... ... ... | १०० पानांस. | ३ | ० | ,, |
| | तार ... ... ... ... — | रतलास. | ० | ९ | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या जिनसा तयार केलेल्या व तयार न केलेल्या ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | वर्ख सोन्याचा विलायती ... ... ... | १०० पानांस. | ३ | ० | ,, |
| | ,, चिनाई व खोटा ... .... | ... | किमतीवर | | ,, |
| | लोखंड— | | | | |
| | नांगर व नांगराच्या सांखळा... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | आंगळ व टी ऐअर्न ... ... ... | टनास. | ११० | ० | ,, |
| | वाहालें व खांब व गर्डर्स, पुलाचें सामान व इमारती कामासाठीं मात्र आणलेलें इतर प्रकारचें लोखंडी सामान ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | चपटें व चौरस व सळ्या, स्काटलंडच्या कांबी सुद्धां ... ... .... ... | टनास. | ९० | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | गालवनैझ्ड खिळ्यांव्यतिरिक्त ... ... | हंड्रेडवेटास. | ९ | ८ | ,, |
| | ,, पत्रे व रिजिंग ... ... ... | ,, | ९ | ८ | ,, |
| | पट्टे व पत्रे स्वीडीशव्यतिरिक्त ... ... | टनास. | १२८ | ० | ,, |
| | खिळे, रोज व क्लास्प व चपटेमाथ्याचे रिव्हेट व वाशर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ११ | ० | ,, |
| | खिळे व इतर प्रकारचे, गालवनैझ्ड सुद्धां ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | खिळे करावयाच्या सळ्या ... ... | टनास. | १०० | ० | ,, |
| | जुनें ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २ | ० | ,, |
| | पाट ... ... ... ... ... | टनास. | ५० | ० | ,, |
| | पैप व टयूब (नळ व नळ्या) .. ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | स्वयंपाकाचीं भांडीं ... ... .... | दाहाचे सेटास. | ४ | ९ | ,, |
| | ,, ,, ... ... ... ... | साहाचे सेटास. | २ | ९ | ,, |
| | सळ्या, गोल, स्वीडिशव्यतिरिक्त, पराकाष्ठा अर्धे इंच व्यासाहून अधिक नसणाऱ्या ... ... | टनास. | १०० | ० | ,, |
| | ,, अर्धे इंचाहून अधिक व्यासांच्या ... | ,, | ९० | ० | ,, |
| | स्विडिश, चपटें, चौरस, व सळ्या ... ... | ,, | १४५ | ० | ,, |
| | खिळे करावयाच्या स्वीडिश सळ्या .. ... | ,, | १७० | ० | ,, |
| | अर्ध्या इंचापेक्षां ज्यांचा व्यास जास्त नाहीं अशा स्वीडिश वाटोळ्या सळ्या... ... ... | ,, | १८० | ० | ,, |
| | कलई केलेले पत्रे... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | |
| | इतर सर्व प्रकारच्या जिनसा, तारीसुद्धां परंतु रेलवेचें सामान ज्याची जकात माफ आहे तें खेरीज करून ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | लामेटा (जरीची तार). | | | | |
| | दुहेरी गुंडाळीं... ... ... ... | कोडीस | ४ | ८ | ,, |
| | एकेरी ... ... ... ... | ,, | २ | ४ | ,, |
| | शिसें— | | | | |
| | सिशाचे दगड ... .... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ | ० | ,, |
| | पाट ... ... ... ... ... | ,, | ९ | ८ | ,, |
| | नळ्या ... ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | पत्रे, चाहाचे डबे करण्याचे ज्यांस जकात माफ आहे ते खेरीज करून ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | ,, |
| | ओरसेड्यू व पितळेचीं पानें परमुलकाचीं ... | | | | |
| | ,, विलायती ... ... ... ... | रतलास. | १ | २ | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | ,, चिनाई ... ... ... .. | रतलास. | १ | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | पेटंट किंवा यलोमेटलचे पत्रे व शीट व सळ्या. ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३८ | ० | ,, |
| | कित्ता कित्ता जुनें ... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | पारा ... ... ... ... ... | रतलास. | १ | ६ | ,, |
| | छरे, पाखरें मरण्याचे ... ... ... | हंड्रेडवेटास. | १६ | ० | ,, |
| | चांदी अगर चांदीचें नाणें, हिंदुस्थान सरकारचें चालू नाणें ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून. ... | | किमतीवर. | | ,, |
| | तिखें— | | | | |
| | ब्लिस्टर्ड ... .. ... .. | हंड्रेडवेटास. | ७ | ० | ,, |
| | ब्रिटिश आणि स्वीडिश खेरीज इतर परमुलकाचें... | ... | किमतीवर. | | ,, |
| | क्यास्ट (ओतीव) ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| | कमाणी ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७ | ० | ,, |
| | स्वीडिश ... ... ... .... | ,, | १३ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें, तयार केलेलें व न तयार केलेलें तिखें रेलवेचें सामान ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | कल्ईचे गोळे ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७० | ० | ,, |
| | ,, बेगड चिनाई ... ... ... ... | रतलास | ० | १२ | ,, |
| | ,, इतर प्रकारची ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | जस्त— | | | | |
| | खिळे ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २१ | ० | ,, |
| | पत्रे, व इतर आकृतीचें, नरम ... ... | ,, | १६ | ० | ,, |
| | ,, ,, कठीण .. ... ... | ,, | १३ | ० | ,, |
| | पत्रे, अगर शिथिंग ... ... ... | ,, | १८ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे धातु ... ... ... | ... | ,, | | ,, |
| | तेलें. | | | | |
| १३ | तेलें— | | | | |
| | दालचिनीचें ... ... ... ... | रतलास. | ३ | ० | ,, |
| | खोबरेल ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १३ | ० | ,, |
| | गवताचें .... ... ... ... | रतलास. | १ | १२ | ,, |
| | तिळाचें ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १९ | ० | ,, |
| | अळशीचें विलायती ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | १ | १२ | ,, |
| | अत्तरें सर्व प्रकारचीं ... ... ... | औंसास. | १० | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू ).

### सामान्य जकात—( पुढें चालू ).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| | पिट्रोलियम, ह्यांत नगेतेलाचा, आणि ज्या प्रवाही पदार्थांस लोकांत राक आईल, रंगूनआइल, वर्माआइल, केरोसीन, पाराफीनआइल, मिनरल-आईल, पिट्रोलाइन, ग्यासोलीन, बेनझोल, बेनझाइन, अशीं नांवें आहेत त्यांचा, आणि पिट्रोलियम, दगडी कोळसा, शिस्ट, शेल, पीट, अगर इतर कोणत्याही बिटयुमिनच्या जातीच्या जळणाऱ्या पदार्थांपासून अगर पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेल्या कोणत्याही पदार्थांपासून तयार केलेल्या कोणत्याही ज्वालाग्राही प्रवाही पदार्थांचा समावेश होतो. ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | ... | एकआणा. |
| | " ज्याचा ज्वलनबिंदु फारनहीटच्या उष्णतामापक यंत्राच्या दोनशेंच्या अंशावर अगर त्याहून वरच्या अंशावर असेल, आणि जें सणाच्या किंवा इतर तंतुमय पदार्थांच्या चाक्या बसविण्यासाठीं अगर वंगणाच्या कारणासाठीं असल्याबद्दल कस्टम्सच्या कलेक्टरची खात्री करण्यांत आलेली असेल, तें ... ... ... ... | " | ... | अर्धाआणा. |
| | चंदनाचें ... ... .... ... | रतलास. | ८ ० | दरशेंकडा ५टक्के. |
| | टार्पिनटैन ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | १ १४ | " |
| | व्हेलचें (स्पर्मसिटी खेरीज करून) व मासळीचें ... | हंड्रेडवेटास. | १५ ० | " |
| | लांकडाचें ... .... ... ... | " | २५ ० | " |
| | इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | किमतीवर. | " |
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ.** | | | |
| १४ | **पोशाक,** हाबरडाशरी ( बुतावें, सुया, सूत इत्यादि ) व मिलिनरी (स्त्रियांच्या टोप्या वस्त्रें करण्याचें कापड इत्यादि सामान ) व लष्करी व इतर युनिफार्म अकौटरमेंट सुद्धां परंतु कोणत्याही सरकारी नोकरानें स्वताच्या उपयोगासाठीं आणिलेले बूट व शू (ह्याबदल नंबर ३९ पाहा) व युनिफार्म व अकौटरमेंट ज्यांस जकात माफ आहे, तीं खेरीज करून. | ... | " | " |
| १५ | कुंचे सर्व प्रकारचे ... ... ... ... | ... | " | " |
| १६ | इमारतीसामान व इंजनीयरी कामाचें सामान ह्मणजे—आस्फाल्ट, सिमेंट सर्व प्रकारचें, मातीच्या पैप ( नळ ) व इतर प्रकार ... ... ... | ... | " | " |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| १७ | पेट्या वगैरे सामान व घरकामाचें सामान ... ... | ... | किमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |
| १८ | मेणबत्त्या— | | | |
| | प्यारॉफैन ... ... ... ... | रतलास. | ० ५ | ,, |
| | चर्बीच्या ... ... ... .. | ,, | ० ६ | ,, |
| | मेणाच्या ... ... ... ... | ,, | १ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या इतर पदार्थ मिश्र करून केलेल्या सुद्धां ... ... ... ... | ,, | ० ५ | ,, |
| १९ | वेत व वेताचे केलेले पदार्थ व टोपल्या वगैरे— | | | |
| | वेत मलाकाचे ... ... ... ... | डजनास. | १ ० | ,, |
| | वेत ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे, बांबवांची जकात माफ आहे ते खेरीज करून ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २० | गाड्या व त्यांचे निरनिराळे भाग रेलवेच्या गाड्या व ट्रक ज्यांची जकात माफ आहे ते खेरीज करून ... | ... | ,, | ,, |
| २१ | चिनाई व जपानाची मातीचीं भांडीं, लाख चढविलेले मातीचे भांड्यांसुद्धां परंतु अर्थनवेर व चैनावेर व पोर्सलनेवर (ह्यासाठीं नंबर २७ पाहा) खेरीज करून ... ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| २२ | क्लाक व वाचें व इतर प्रकारचीं घड्याळें ... ... | ... | ,, | ,, |
| २३ | काथा व काथ्याचे केलेले पदार्थ काथ्याचे केलेले तारवाचे दोर व दोर खेरीज करून (ह्यासाठीं नंबर २५ पहा)— | | | |
| | दोर सर्व जातीचे ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २४ | पोवळीं खरीं ... ... ... | ... | ,, | ,, |
| २५ | चऱ्हाटें व दोर झाडपाल्याचे तंतूचे केलेले— | | | |
| | काथ्याचे तारवाचे दोर, तार लावलेले ... ... | हंड्रेडवेटास. | १० ० | ,, |
| | काथ्याचे दोर ... ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | दोर सणाचे विलायती ... ... .. | ,, | २५ ० | ,, |
| | ,, मनिलाचे ... ... ... ... | ,, | ३० ० | ,, |
| | सुतळ शिडाची विलायती ... ... ... | रतलास. | ० ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचीं चऱ्हाटें व दोर ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २६ | बूच व बुचाचे केलेले पदार्थ— | | | |
| | बाटल्यांचे बूच ... ... ... ... | ग्रोसास. | १ ० | ,, |
| | शिश्यांचे (कुप्यांचे) बूच ... ... ... | ,, | ० ४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| २७ | मातीचें सामान ( मातीचे पैप ह्मणजे नळ खेरीजकरून ह्यासाठीं नंबर १६ पहा ) व चैनावेर ( चिनाई कांचेचें सामान ) व चिनाई माती व पोर्सलेन ... ... ... ... | ... | किमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |
| २८ | पिसें ... ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| २९ | दारूकाम— | ,, | | |
| | चिनाई ... ... ... ... | १३३⅓ रतलाचे पेटीस. | ३५ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३० | सण व सणाचे केलेले पदार्थ— | | | |
| | कितान, शिडाचें, विलायती, पराकाष्ठा ४० वार, | बोल्टास. | २२ ० | ,, |
| | कापड ... ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे, सणाचे दोऱ्यासुद्धां... ... | ... | ,, | ,, |
| ३१ | कांच व कांचूकाम व मणी व खोटीं मोत्यें व खोटीं पोवळीं— | | | |
| | बांगड्या कांचेच्या चिनाई मुलामेदार ... ... ... | १०० जोड्यांस | १५ ० | ,, |
| | ,, ,, वगर मुलाम्याच्या ... ... | ,, | ३ ० | ,, |
| | मणी चिनाई ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३६ ० | ,, |
| | पोवळीं खोटीं ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| | कांच चिनाई सर्व रंगाची ... ... ... | १३३⅓ रतलास. | ३२ ० | ,, |
| | ,, तावदानाच्या रंगित .. ... ... | १०० फूट क्षेत्रफळास. | १४ ० | ,, |
| | ,, ,, लहानमोठ्या ... ... | ,, | ६ ८ | ,, |
| | मोतें खोटीं— | | | |
| | बाजरिया ... ... ... ... | लाखास. | ३ ० | ,, |
| | बोरिया ... ... ... ... | हजारास. | १ ० | ,, |
| | जुवाऱ्या ... ... ... ... | लाखास. | ९ ० | ,, |
| | लोलक... ... ... ... ... | हजारास. | ० १२ | ,, |
| | नथिया.... ... ... ... ... | ,, | ० ३ | ,, |
| | टचिया... ... ... ... ... | ,, | १ ० | ,, |
| | वटाणिया ... ... ... ... | लाखास. | १० ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे मणी व खोटीं मोत्यें व कांचा व कांचेचें सामान... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३२ | गुंद व गुंदाचे केलेले पदार्थ— | | | |
| | चंदुस ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९६ ० | ,, |

## पारिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| | कच व ग्यांबियर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १७ ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | गम, आमोनियाक ... ... ... ... | ,, | १४ ० | ,, |
| | ,, आर्बस्थानी ( गुंद ) ... ... ... | ,, | १८ ० | ,, |
| | ,, गुग्गुळ ... ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | ,, लोबान किंवा ऊद ... ... ... | ,, | ४० ० | ,, |
| | ,, बैशाबोळ ... ... ... ... | ,, | १४ ० | ,, |
| | ,, कवड्या लोबान ... ... ... | ,, | १२ ० | ,, |
| | ,, इराणी ( खोटा ) ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | ,, काथ ... ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | बोळ ... ... ... ... ... | ,, | ४० ० | ,, |
| | रोजिन ( राळ ) ... ... ... ... | ,, | ४ ४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे गुंद व गुंदाचे केलेले पदार्थ ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३३ | ताग व तागाचे केलेले पदार्थ— | | | |
| | कापड व इतर सर्व पदार्थ दोर खेरीज करून ( ह्यासाठीं नंबर २९ पाहा) ... ... ... | ... | ,, | ,, |
| ३४ | कातडीं व चांमडीं (कच्चीं किंवा मीठ लावलेलीं कातडीं व चांमडीं ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून)— | | | |
| | कातडीं— | | | |
| | बार्डर ... ... ... ... | एकास. | ३२ ० | ,, |
| | म्हशीचीं ... .... ... ... | कोडीस. | ८० ० | ,, |
| | गाईचीं ... ... ... ... | ,, | ६० ० | ,, |
| | चांमडीं सर्व प्रकारचीं ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३५ | यंत्रें व संच— | | | |
| | वाद्यें, चित्रें काढण्याचीं, मोजण्याचीं, दर्शनानुशासन शास्त्रसंबंधी, फोटोग्राफीचीं ( फोटोग्राफ काढण्याचे पदार्थांसुद्धां ), सर्वेचीं, शस्त्रवैद्यकीचीं ( शस्त्र वैद्यकीचे सामानासुद्धां ) ... ... ... | ... | ,, | ,, |
| ३६ | हस्तिदंत व हस्तिदंताचें सामान— | | | |
| | घांट न घडलेला— | | | |
| | हत्तीच्या दाढा... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२५ ० | ,, |
| | हस्तिदंत (पोंकळ भाग, मध्यभाग व अणीकडचा भाग खेरीज करून) प्रत्येक २० रतलांहून अधिक वज- | | | |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | नाचा, आणि पोंकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचे भाग, प्रत्येक १० रतल व १० रतलांहून जास्त वजनाचा ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ८०० ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | हस्तिदंत (पोंकळ भाग, मध्यभाग व अणीकडचा भाग खेरीज करून) प्रत्येक १० रतलांहून कमी नाहीं व २० रतलांहून अधिक नाहीं असा, आणि पोंकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचे भाग प्रत्येक १० रतलांहून कमी अशा वजनाचा ... ... | ,, | ६८० ० | ,, |
| | हस्तिदंत (पोंकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचा भाग खेरीज करून) प्रत्येक १० रतलांहून कमी वजनाचा. | ,, | ६२५ ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत ह्मणतात ते प्रत्येक ४ रतलांहून कमी वजानाचा नाहीं असा. | ,, | १७५ ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत म्हणतात ते, प्रत्येक ३ रतलांहून कमी नाहीं व ४ रतलांहून कमी अशा वजनाचा ... ... | ,, | १७० ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत म्हणतात ते, प्रत्येक ३ रतलांहून कमी वजनाचा ... ... | ,, | १३० ० | ,, |
| | हस्तिदंताच्या केलेल्या जिनसा ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३७ | जडावाचे दागिने, रुप्याचे भांड्यांसुद्धां— | | | |
| | रुप्याचीं भांडीं साधीं } विलायती खेरीज इतर ... | तोळ्यास. | १ ० | ,, |
| | ,, नकसीदार. } ... ... | ,, | १ ४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचीं, न बसविलेलें जवाहीर व मोतें ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३८ | अंबाडीचे पदार्थ, गोण ज्यांस जकात माफ आहे ते खेरीज करून ... ... ... ... | .. | ,, | ,, |
| ३९ | चामडें व चामड्याचे केलेले पदार्थ, बूट व शू व हरनीस व जीन यांसुद्धां परंतु यंत्रें चालविण्यासाठीं चामड्याचे पट्टे येतात ज्यांची जकात माफ आहे ते खेरीज करून.... ... ... ... | ... | ,, | ,, |
| ४० | मरीन व आरमारी सामान, इतर रीतीनें वर्णन न केलेलें असें ... ... ... ... | ..... | ,, | ,, |
| ४१ | आगीच्या काड्या, लुसिफर व इतर सर्व प्रकारच्या ... | ... | किमतीवर. | ,, |
| ४२ | हांतऱ्या— | | | |
| | जमिनीवर हांतरावयाच्या चिनाई व सिंगापुरी, सर्व प्रकारच्या ... ... ... ... | शंभरांस. | ७५ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या, काथ्याच्या हांतऱ्या खेरीज करून (ह्यासाठीं नंबर २३ पाहा) ... ... | ... | किमतीवर. | ,, |

## परिशिष्ट ४ थें.—(पुढें चालू).

### सामान्य जकात.—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| ४३ | आइलक्लाथ व फोरक्लाथ ( एका जातीचें कापड ). | .... | किमतीवर. | | दर शेंकडा ५ टक्के. |
| ४४ | रंग, रंगाऱ्याचें सामान व चांबड्यांस व धातूंस लावण्यासाठीं कांपोजिशन ( बनावलेले रंग )— | | | | |
| | गेरू, विलायती खेरीज इतर सर्व रंगाचा ... | हंड्रेडवेटास. | १ | ८ | ,, |
| | रंग सर्व प्रकारचे ... ... ... ... | ,, | ९ | ० | ,, |
| | कांपोजिशन पेंट ... ... ... ... | ,, | ६६ | ० | ,, |
| | पेटंट ड्रायर्स ... ... ... ... | ,, | १० | ० | ,, |
| | प्रशियनव्लू ( आसमानीरंग ) चिनाई ... ... | रतलास. | ० | १० | ,, |
| | ,, ,, ,, विलायती ... | ,, | १ | ० | ,, |
| | सेंदूर ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ | ० | ,, |
| | टर्पेंटैन ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | १ | १४ | ,, |
| | जंगल ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७० | ० | ,, |
| | हिंगुळ, कनूतानचा ... ... ... | ९० पुड्यांचे पेटीस. | ९४ | ० | ,, |
| | सफेदा... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १४ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचा ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ४५ | कागद— | | | | |
| | वालपेपर ( भिंतीवर लावण्याचें ) ... ... | ... | ,, | | ,, |
| ४६ | सुगंधी पदार्थ— | | | | |
| | गुलाबाचीं फुलें सुकीं ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ | ० | ,, |
| | गुलाबाचें पाणी ... ... ... ... | इंपिरियल ग्यालनास. | १ | १४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे, सुगंधी स्पिरिट ( ज्यासाठीं परिशिष्ट ३ पाहा ) खेरीजकरून ... ... | .. | किमतीवर | | ,, |
| ४७ | कापड, ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला नाहीं तें; कापसाचें कापड ज्यावर जकात माफ आहे तें खेरीजकरून ... ... ... .. | ... | ,, | | ,, |
| ४८ | तंबाकू ओढण्यांत ज्या नळ्यांचा व इतर साधनांचा उपयोग करतात त्या नळ्या व इतर साधनें ... | ... | ,, | | ,, |
| ४९ | पिच व तार व डामर— | | | | |
| | बिच्युमेन ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| | डामर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६ | ० | ,, |
| | पिच ( एका जातीची तार ) अमेरिकेचें व विलायती. | ,, | ६ | ० | ,, |
| | ,, कोल ... ... ... ... | ,, | ३ | ८ | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | तार अमेरिकेची व विलायती ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६ | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | ,, कोल ... ... ... ... | ,, | २ | ८ | ,, |
| | ,, खाणींतिल ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ५० | बीं— | | | | |
| | एरंड्या ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४ | ८ | ,, |
| | जिरें ... ... ... ... ... | ,, | १७ | ० | ,, |
| | ,, काळें ... ... ... ... | ,, | ६ | ० | ,, |
| | अळसी ... .... ... . | ,, | ५ | ८ | ,, |
| | मेंथी ... ... ... ... ... | ,, | ४ | ० | ,, |
| | मोहऱ्या किंवा सिरीस ... ... ... | ,, | ५ | ० | ,, |
| | खसखस ... ... ... ... | ,, | ६ | ० | ,, |
| | बेदाणा ... ... ... ... | ,, | ४० | ० | ,, |
| | शाहाजिरें ... ... .. .. | ,, | २२ | ० | ,, |
| | तीळ ... ... ... ... ... | ,, | ७ | ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ५१ | शिंप्या व कवड्या— | | | | |
| | शंख मोठे क्यामिओसाठीं ... ... | शेंकडा. | ६ | ८ | ,, |
| | ,, पांढरे जिवंत ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | ,, ,, मेलेले ... ... ... ... | ,, | ४ | ० | ,, |
| | कवडे. ... ... ... ... ... | ,, | ० | ८ | ,, |
| | कवड्या बाजारी साधारण ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३ | ० | ,, |
| | ,, मालदीवच्या... ... ... ... | ,, | ७ | ८ | ,, |
| | ,, नखला ... ... ... ... | ,, | ६५ | ० | ,, |
| | ,, संखळी ... ... ... .. | ,, | ६० | ० | ,, |
| | ,, पिवळ्या उंच प्रतीच्या ... ... ... | ,, | २ | ८ | ,, |
| | मोत्यांचे शिंपे ... ... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | कचकडा नखल्या... ... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | ,, नख ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ५२ | रेशमी व रेशमाचे केलेले जिन्नस— | | | | |
| | मोकळें चिकन भरण्याचें ... ... ... | रतलास. | ९ | ० | ,, |
| | कापड... ... .. .. ... | ... | किमतीवर. | | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू)

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नावें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| | कचें रेशीम.— | | | |
| | चहारमचें व कोचीन चैनाचें व पिवळें शांघाई ... | रतलास. | ५ ४ | दर शेंकडा ५ टक्के. |
| | माथीचें ... ... ... ... | ,, | ३ ४ | ,, |
| | चिनाई इतर जातींचें ... ... ... | ,, | ७ ० | ,, |
| | कचरा व गाळ ... ... ... ... | ,, | १ २ | ,, |
| | पंजमचें ... ... ... ... | ,, | २ ० | ,, |
| | इराणी... ... ... ... ... | ,, | ४ ४ | ,, |
| | सायमचें ... ... ... ... | ,, | २ ० | ,, |
| | टासर अगर इतर जंगली किड्यांपासून उत्पन्न झालेलें ... ... ... ... | ,, | २ ८ | ,, |
| | शिवायाचें, चिनाई ... ... ... | ,, | ९ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ५३ | साबू ... ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| ५४ | स्टेशनरी ... ... .... ... ... | ... | ,, | ,, |
| ५५ | सांवें व संगमरवरी दगड ... ... ... | ... | ,, | ,, |
| ५६ | चरबी ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २५ ० | ,, |
| ५७ | टाकमटिका करण्यास जरूर असणारें सामान ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला नाहीं तें ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ५८ | खेळणीं व सर्व प्रकारचे खेळ खेळण्यास जरूर असणारें सामान ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| ५९ | छत्र्या, सुती, २० इंचांहून कमी ... ... | प्रत्येकीं. | ० १० | ,, |
| | ,, ,, २० इंचांच्या व जास्त मोठ्या ... | ,, | १ ० | ,, |
| | ,, ,, रोगणी, विलायतीशिवाय इतर ... | ,, | ० ९ | ,, |
| | ,, ,, इतर सर्व प्रकारच्या, कागदी छत्र्या धरून ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ६० | मेण ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३२ ० | ,, |
| ६१ | लांकूड व इतर इमारतीचें लांकूड ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ६२ | लोंकरीचा माल— | | | |
| | लोंकरीचे दोरे ... ... ... ...<br>होजियरी ( मोजे वगैरे.) ... ... ...<br>कापड ... ... ... ... ...<br>इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | ,, | ,, |

## परिशिष्ट ९ वें.

### देशांतून बाहेर जाणारे मालाचें त.रीफ.

| पदार्थांचीं नांवें. | जकातीचा दर. |
| --- | --- |
| तांदूळ, भात व तांदुळाचें पीठ. | ८२ २/७ अवार्डुपाइज रतलांच्या दरमणास तीन आणे. |

### हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

---

जमाखर्चाच्या संबंधानें सरकाराची फार तंगचाई झाल्यामुळें आणि चालूसालच्या हिशेबांत आणि सन १८९४-९५ सालच्या जमाखर्चाच्या अंदाजांत फारच मोठी तूट येईल असें आतां नक्की दिसत असल्यामुळें, आपल्या खर्चांत काटकसर करतां येईल तितकी सरकारास करावी लागत आहे, आणि राज्यकारभाराचा खर्च चालविण्यासाठीं नेहमींपेक्षां जास्त महसूल उत्पन्न करावा लागत आहे.

ह्मणून, आयात मालावरील जकातीच्या रूपानें अप्रत्यक्ष कर बसवून जास्त महसूल उत्पन्न करण्याचें सरकारानें ठरविलें आहे वस्तुतः ह्या मसुद्यावरून, सन १८७५ चें तारिफाचें परिशिष्ट, कांहीं फेरफारांनिशीं, अमलांत येणार आहे. ह्यांत, कापसाच्या सुतावरची व कापडावरची जकात गाळलेली आहे, हा फेरफार विशेष महत्वाचा आहे.

(सही) जे. वेस्टलंड.

तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १८९४.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.